Koyana Education Society's
**Balasaheb Desai College, Patan.**
Tal- Patan Dist- Satara.

# NATIONAL SERVICE SCHEME

(Affiliated to N.S.S. Cell, Shivaji University Kolhapur)

" NOT ME BUT YOU "
(Best N.S.S. Unit & Best P.O-Award Received by Goverment of Maharashtra)

## NSS IN MEDIA

Page 3_12-10-2023
12 Oct 2023

दैनिक
एकमेव विचारपत्र
**महाराष्ट्र न्यूज**

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

## 'एनएसएस'च्या माध्यमातून पर्यावरण रक्षण करता येते : शिशुपाल पवार



**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**
**पाटण, दि.११ ऑक्टोबर :** सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यात माणूस भौतिक सुखाच्या मागे लागून पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे. निसर्गाकडे आपण लक्ष देत नाही याचा वाईट परिणाम आपणास भोगायला लागत आहे मात्र राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपणास पर्यावरण जागृती करणे शक्य आहे व विविध उपक्रमाद्वारे वन विभाग व एन.एस.एस. च्या माध्यमातून आपणास पर्यावरण रक्षण करता येईल असे मत वनपरिक्षेत्र अधिकारी शिशुपाल पवार यांनी व्यक्त केले. बाळासाहेब देसाई कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

बाळासाहेब देसाई कॉलेजचे पाटण याठिकाणी आज राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी शिशुपाल पवार हे होते तर अध्यक्ष म्हणून रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. ए. कळंत्रे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप तडाखे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पर्यावरण रक्षणाचा संदेश देत कुंडीतील रोपाला पाणी घालून करण्यात आली त्यानंतर कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी.एस. पट्टेबहादूर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी थोडक्यात राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम याची माहिती सांगितली. व विशेष कार्य केलेल्या एन.एस.एस. विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुणे वनपरिक्षेत्र अधिकारी शिशुपाल पवार यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला पर्यावरण म्हणजे काय याबद्दल माहिती सांगितली तसेच ग्लोबल वार्मिंग म्हणजे काय त्याचे मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम याची माहिती दिली. विकासासाठी आपण पर्यावरण धोक्यात आणून चालणार नाही फक्त आपल्या पिढीचा विचार न न करता पुढच्या पिढीचा विचार केला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करणे असे असले तरी एन.एस.एस. व विभाग एकत्रितरित्या पर्यावरण रक्षण नाकीच करू शकतो असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रा. डॉ. व्ही. ए. कळंत्रे यांनी अध्यक्षीय भाषणात म्हणाले कि, राष्ट्रीय सेवा योजना हे अनुभवांचे भांडार आहे. त्या अनुभवातून गुणविशेष निर्माण होऊन विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व साकारले जाते. तसेच शिबीर कालावधी मध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या माध्यामतून समानत्व या भावनेचा विकास होतो. असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. संदीप तडाखे यांनी आभार प्रदर्शन केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. बी. व्ही जाधव यांनी सहकार्य केले

या उद्घाटन कार्यक्रमावेळी प्रा.श्रीगणेश गायकवाड, प्रा. विशाल कांबळे प्रा. आयेशा आतार यांच्यासह एन.एस.एस.चे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती धर्मांना न्याय दिला : डॉ. एस.एम. कांबळे

**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**पाटण, दि. ८ डिसेंबर:** भारतातील वर्ग लढ्याला आणि जाती अंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. वर्ग, जात, धर्म, लिंग यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काम केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती धर्मांना न्याय दिला असे मत सौ. मंगलाताई जगताप महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे यांनी व्यक्त केले. ते बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रमानिमित प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सामाजिकशास्त्र मंडळ यांच्या तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मंगलाताई जगताप महिला महाविद्यालयाचे प्रा. डॉ.



एस.एम. कांबळे हे होते तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. जी.एस. पट्टेबहादूर होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. एस.एम.कांबळे यांनी आपल्या मनोगतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनाविषयी त्यांच्या कार्याविषयी माहिती सांगीतली तसेच दरवर्षी ६ डिसेंबर हा दिवस भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुण्यतिथी दिवस म्हणून साजरा केला जातो. बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन ६ डिसेंबर १९५६ रोजी झाले. बाबासाहेबांची पुण्यतिथी देशभरात ममहापरिनिर्वाण दिन आदरांजली वाहून साजरी केली जाते. अध्यक्षीय भाषणात डॉ. एस.डी. पवार म्हणाले डॉ. आंबेडकरांचा हा दिमाखदार जीवन प्रवास, त्यांच्या अभ्यासू आणि कृतीशील व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवतो. सर्वात प्रथम, त्यांनी अर्थशास्त्र, राजकारण, कायदा, तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान संपादन केले. शिक्षण घेताना त्यांना अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागले. पण त्यांनी आपले आयुष्य केवळ वाचन-अभ्यास आणि ग्रंथालयात व्यतीत केले नाही. त्यांनी आकर्षक पगाराची उच्च पदे नाकारली, कारण ते शोषित वर्गातील आपल्या बधुंना विसरले नाहीत. त्यांनी आपले उर्वरित आयुष्य समता, बंधुता आणि मानवतेसाठी समर्पित केले. पिचलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी कनिष्ट विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार यांनी आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

लोकमत



ाजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर पार डले. यावेळी संजीव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरीच्या डॉ. ोद्या पाटील, डॉ. बी. बी. पाटील उपस्थित होते.

# विक्रमसिंह पाटणकर यांचा ाढदिवसानिमित्त उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

पाटण : माजी सार्वजनिक बांधकाम पर्यटनमंत्री विक्रमसिंह पाटणकर ांचा वाढदिवस विविध सामाजिक पक्रमांनी साधेपणाने साजरा करण्यात ाला. यादिवशी माजी मंत्री पाटणकर : परगावी असल्याने अनेक मान्यवरांनी यांना दूरध्वनीवरून शुभेच्छांचा वर्षाव ेला.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर ुधवार, दि. २७ रोजी काही ारणास्तव परगावी असल्याने पाटण िधानसभा मतदारसंघात त्यांचा ाढदिवस व्हॉलीबॉल स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, वृक्षारोपण, रक्तदान शिबि फळवाटप, अन्नदान, शिबि व्याख्याने, विविध स्पर्धा, गोरगरिबां ब्लँकेट वाटप आदीसह भजन स्पर्ध वक्तृत्व स्पर्धा कार्यक्रम अश सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातू साजरा करण्यात आला. तालुक्याती विविध संस्थांनी विविध उपक्रम राबवू वाढदिवस उत्साहात साजरा केल माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यां वाढदिवसानिमित्त राज्यातील विवि मंत्री, खासदार आमदार, विवि पक्षांच्या कार्यकर्त्यांनी, मान्यवरां दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. (वा.प्र.)

Hello Satara
Page No. 4 Dec 28, 2023
Powered by: erelego.com

नवराष्ट्र

## एनएसएसचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांचे मत; शिबिरातून समाजप्रबोधन करणारे उपक्रम

# श्रमसंस्कार शिबिरे काळाची गरज

पाटण, (वा.) श्रम संस्कार शिबिरे काळाची गरज असून अशा शिबिरातुन समाज प्रबोधन करणारे व समाज उपयोगी नवीन उपक्रम विद्यार्थ्यांनी राबवले पाहिजे. तसेच श्रम संस्कार शिबिरातुन श्रमाचे संस्कार घडत असतात. संत गाडगेबाबा यांनी स्वच्छता माध्यमातुन काम केले त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे एन. एस. एस.चे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. उदघाटक म्हणून कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण होते. यावेळी अध्यक्ष म्हणून बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थित म्हणून विथी मौजे सलतेवाडीच्या सरपंच रुपाली सलते, उपसरपंच अमोल देसाई प्रा. डॉ. एच. व्ही काटे, पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे, महाविद्यालयाचे शिबीर संचालक व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर हे उपस्थित होते.




कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण संचलित बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन मौजे सलतेवाडी (ता. पाटण) याठिकाणी करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व मान्यवरांचा स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते अवजारांचे पूजन करून विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

शिबिराचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, दि. ४ ते १० जानेवारी या कालावधीत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरामधील विविध उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. आभार डॉ. भरत जाधव यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी काजल साळुंखे हिने केले. यावेळी जुनियर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार, प्रा. डॉ. भरत जाधव, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. ए. ए. सूर्यवंशी, प्रा. टी. आय. पाटणकर, प्रा. व्ही.आर. शिर्के प्रा. एस. जी. फुटाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के. शिर्के यांच्यासह मौजे सलतेवाडी गावचे पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.

### गावातील विकासासाठी श्रम हे महत्वाचे

पट्टेबहादूर यांनी एन.एस.एस.चा स्वयंसेवक कसा असावा याबद्दल माहिती सांगितली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, या विशेष श्रमसंस्कार शिबीराचे सात दिवस आयोजन केले होते. सात दिवस वेगवेगळ्या विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. ग्रामस्थांच्या सहकार्यातून राबवलेले उपक्रम व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले श्रम हे गावासाठी महत्त्वाचे ठरतील असे त्यांनी सांगितले.

### शिबिरातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

संजीव चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, श्रम संस्कार शिबीर हे आयुष्य घडवित असते. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना त्यांना सामाजिक कार्याची ओळख करून देणे होय. तसेच श्रमाचा आनंद घ्यायला शिका असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे डॉ. टी. एम. चौगले यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, श्रम संस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळतो. तसेच त्यांच्या नैतिक मूल्यांचा विकास होतो शिक्षणातून समाजसेवा व समाजसेवातून शिक्षण यासाठी एन.एस.एस. असते. विशेष श्रम संस्कार शिबिरातून विद्यार्थी समाजाशी जोडला जातो.

Paschim Maharashtra Plus Edition
07 January 2024 Page No. 2
epaper.navarashtra.com

# ऐक्य

## युवा शक्तीला नवचेतना देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेतून होते : डॉ. माने




मार्गदर्शन करताना डॉ. एन. बी. माने, व्यासपीठावर श्रीमंत अमरसिंह पाटणकर व मान्यवर.
(श्रीगणेश गायकवाड)

पाटण, दि. १४ : जीवनात यशस्वी होण्यासाठी श्रम केले पाहिजेत आणि हेच श्रमाचे संस्कार विद्यार्थ्यांना एन. एस. एस. मधून दिले जातात. देशातील युवा शक्तीला नवचेतना देण्याचे कार्य देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होत असते. एन. एस. एस. ही संस्कारांची कार्यशाळा आहे, असे मत एन. एस. एस. चे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. एन. बी. माने यांनी व्यक्त केले.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, पर्यवेक्षक प्रा. डी. बी. दाभाडे, बिबी मौजे सलतेवाडी गावच्या सरपंच सौ. रुपाली सलते, उपसरपंच अमोल देसाई, शिबिर संचालक व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

डॉ. एन. बी. माने म्हणाले, पर्यावरणाचे रक्षण करा. एक झाड दत्तक घेवून त्याची देखभाल केल्यास ते सुद्धा एक प्रकारचे निसर्ग संवर्धन असते. राज्यात शिवाजी विद्यापीठाच्या एन. एस. एस. विभागाचे काम उल्लेखनीय आहे. त्यामध्ये बाळासाहेब देसाई कॉलेजचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

अमरसिंह पाटणकर म्हणाले, जीवनात प्रत्येक गोष्टीचा अनुभव आनंदाने घ्या. आपण सर्वांनी स्वत: बरोबरच समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. जीवन सुंदर आहे त्याचा चांगल्या पद्धतीने वापर करा. जीवनातील प्रत्येक क्षण आपले आयुष्य घडविण्यासाठी वापरा, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, एन. एस. एस. हे आपणास श्रमाचा आनंद घ्यायला शिकवते. या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये सात दिवस जे ज्ञान मिळाले आहे ते आयुष्यभर आचरणात आणा. ज्ञान घ्या त्याचबरोबर ज्ञान वाटा आपल्याला आनंद मिळेल.

प्रा. डॉ. जी.एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविकात शिबिर कालावधीत राबविलेल्या विशेष उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी शिबिरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्याला आलेले अनुभव मनोगतातून व्यक्त केले. पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनीही आपली मनोगत व्यक्त केली. काजल साळुंखे हिने सुत्रसंचालन केले. प्रा. बळीराम लोहार यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. भरत जाधव, डॉ. एस. एस. तडाखे, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. एल. जी. गणगे, प्रा. डॉ. सौ. एस. एस. कुंभार, प्रा. ए. ए. सूर्यवंशी, प्रा. सौ. टी. आय. पाटणकर, प्रा. व्ही. आर. शिर्के, प्रा. एस. जी. फुटाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के. शिर्के यांच्यासह बिबी मौजे सलतेवाडी गावचे पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.

DainikAikya Edition
Jun 15, 2024 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# पुण्यनगरी

## एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी श्रमदानातून साकारले वनराई बंधारे



वनराई बंधारे बांधताना प्राध्यापक, एन.एस.एस.चे विद्यार्थी.

**पाटण / प्रतिनिधी**

'पाणी आडवा पाणी जिरवा' या जीवसृष्टीच्या रक्षणासाठी सुपक कल्पनेतून पिंपळोशी, कोयना भागातील गोकुळ येथे पाच ठिकाणी असलेल्या डोंगर उतारावर एन.एस.एस.चे स्वयंसेवक, प्राध्यापक, एन.जी.ओ., ग्रामस्थांच्या मदतीने श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्यात येत आहेत. या वनराई बंधाऱ्यामुळे पाटण तालुक्याच्या डोंगराळ भागात अनेक ठिकाणी भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे, यामुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण एन.एस.एस. विभाग, पिंपळोशी ग्रामपंचायत तसेच कोयना भागातील एन.जी.ओ. यांच्या माध्यमातून गोकुळ याठिकाणी एन.एस.एस.चे स्वयंसेवक, प्राध्यापकांनी, ग्रामस्थांनी एकत्रितपणे पिंपळोशी येथील नदीवर दोन बंधारे बांधण्यात आले. तसेच गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तर गोकुळ जवळच असलेल्या डोंगर उतारावर 'पाणी अडवा पाणी जिरवा' या संकल्पनेचा पुरेपूर प्रत्यक्षात उपयोग करण्यासाठी छोटे छोटे मातीचे जवळपास तीस फुट लांब, चार फुट रुंद बंधारे बांधून पूर्ण केले.

पावसाळ्यातील परतीच्या पावसाचे पाणी वनराई बंधाऱ्यामुळे अडवले गेल्याने या पाणीसाठ्याचा भविष्यात उपयोग डोंगर परिसरातील पशुपक्षी, जनावरे निसर्गातील प्रत्येक घटकाला याचा फायदा होईल अशा कल्पनेतून हे वनराई बंधारे बांधण्यात आले. हे श्रमदान राबविण्यासाठी पिंपळोशी ग्रामपंचायत सरपंच विशाल निकम तसेच सर्व पदाधिकारी एन.जी.ओ चे सुनिल काळे, बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. जी.एस. पट्टेबहादुर, कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव. जुनियर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार, प्रा. दिनेश रेवडे, प्रा.शेखर फुटाणे पिंपळोशी ग्रामपंचायत पदाधिकारी, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक यांच्या श्रमदानाच्या माध्यमातून निसर्ग रक्षणासाठी पाच ठिकाणी वनराई बंधारे बांधले आहेत. यावेळी बाळासाहेब देसाई कॉलेजचे डॉ. संदीप तडाखे, प्रा. विशाल कांबळे, प्रा.श्रीगणेश गायकवाड, प्रा.एल. जी. गणगे, प्रा. एस.डी. कदम, प्रा. आर.के शिर्के प्रा.सौ.डॉ. एस.एस. कुंभार प्रा. सौ. शिर्के ,प्रा. सौ. टी. आय. पाटणकर तसेच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी श्रमदानात सहभाग नोंदवला.

Satara Edition
Feb 13, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

दैनिक
एकमेव विचारपत्र
# महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

## एनएसएस संस्काराची प्रयोगशाळा : डॉ. माने

महाराष्ट्र न्यूज नेटवर्क
पाटण, दि. १२ जानेवारी : जीवनात यशस्वी होण्यासाठी श्रम केले पाहिजेत आणि हेच श्रमाचे संस्कार विद्यार्थ्यांना एन.एस.एस. मधून दिले जातात. देशातील युवा शक्तीला समाजसेवा देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होत असते. तरीच एन.एस.एस. ही संस्काराची कार्यशाळा आहे. असे मत एन.एस.एस.चे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.एस.पी.माने यांनी व्यक्त केले. ते बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी अध्यक्ष म्हणून कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर हे होते. तर प्रमुख उपस्थित म्हणून बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी.पवार, पर्यवेक्षक प्रा. डी. बी. दाभाडे, बिबी मौजे सलतेवाडी गावच्या सरपंच सौ. रुपाली सलते, उपसरपंच अमोल देसाई, महाविद्यालयाचे एन.एस.एस.शिबीर संचालक व कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जी.एस. पट्टेबहादूर हे उपस्थित होते.

कोयना एज्युकेशन सोसायटी,पाटण संचलित बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप समारंभ बिबी मौजे. सलतेवाडी ता. पाटण याठिकाणी करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व मान्यवरांचा स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर शिबिराचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जी.एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक करताना दि. ०४ जाने.२०२४ ते १० जाने. २०२४ या कालावधीत केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिरामधील विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. एस.पी माने यांनी आपल्या मनोगतात पर्यावरणाचे रक्षण करा. एक झाड दत्तक घेवून त्याची निट देखभाल केल्यास ते सुद्धा एक प्रकारचे




निसर्ग संवर्धन असते असे मत त्यांनी व्यक्त केले.त्याचबरोबर राज्यात शिवाजी विद्यापीठाच्या एन.एस.एस. विभागाचे काम उल्लेखनीय आहे त्यामध्ये बाळासाहेब देसाई कॉलेजचे योगदान चांगल्या प्रकारे आहे असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. पवार भाषणात म्हणाले की, एन.एस.एस. हे आपणास श्रमाचा आनंद घ्यायला शिकवते. या विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये सात दिवस जे ज्ञान मिळाले आहे ते आयुष्यभर आचरणात आणा ज्ञान घ्या त्याचबरोबर ज्ञान वाटा आपल्याला आनंद मिळेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

शेवटी अध्यक्षीय मनोगतात श्रीमंत अमरसिंह पाटणकर म्हणाले की,जीवनात प्रत्येक गोष्टीचा अनुभव आनंदाने घ्या. आपण सर्वांनी स्वत:बरोबरच समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. जीवन सुंदर आहे त्याचा चांगल्या पद्धतीने वापर करा. जीवनातील प्रत्येक क्षण आपले आयुष्य घडविण्यासाठी वापरा असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिबिरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्याला आलेले अनुभव मनोगतातून व्यक्त केले. त्याचबरोबर बिबी मौजे सलतेवाडी गावचे पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी सुद्धा आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन ज्युनियर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.बळीराम लोहार यांनी केले तर सूत्रसंचालन कु. काजल साळुंखे हिने केले. यावेळी डॉ. भरत जाधव, डॉ.एस.एस. तडाखे,प्रा. दिनेश रेवडे, प्रा.श्रीगणेश गायकवाड, प्रा.एल.जी.गणगे, प्रा.डॉ. सी.एस.एस. कुंभार, प्रा. ए.ए. सूर्यवंशी ,प्रा.सी. टी. आय. पाटणकर, प्रा. व्ही. आर. शिर्के प्रा.एस.जी. फुटाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे,प्रा.एस.डी.कदम,प्रा.आर.के शिर्के, यांच्यासह बिबी मौजे सलतेवाडी गावचे पोलीस पाटील,ग्रामपंचायत सदस्य व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.

# ऐक्य

## निरोगी जीवनासाठी हास्य गरजेचे : एस. पी. पाटील

पाटण, दि. ९ : समाजात स्पर्धा प्रचंड वाढली आहे. या स्पर्धेच्या युगात जगत असताना विविध प्रकारच्या ताणतणावातून प्रत्येकाला जावे लागते. त्यातून आजार निर्माण होत असतात. म्हणून निरोगी जीवनासाठी हास्य गरजेचे आहे. जीवनातील ताणतणाव टाळण्यासाठी खळखळून हसले पाहिजे, असे मत प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी व्यक्त केले.

बिबी (सलतेवाडी), ता. पाटण येथे बाळासाहेब देसाई कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी लेफ्टनंट प्रा. डॉ. संतोष पाटील, प्रा. व्ही. एस. माथणे, सलतेवाडीचे पोलीस पाटील संदीप सलते, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांची उपस्थिती होती.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एस. पी. पाटील. व्यासपीठावर मान्यवर. (श्रीगणेश गायकवाड)

प्रा. डॉ. संतोष पाटील म्हणाले, हास्य हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक प्रसंगात विनोद लपलेला असतो. तो आपण शोधला पाहिजे, असे सांगून आपल्या काव्यमय विनोदी शैलीने विविध विनोदी चुटकुल्यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना खळखळून हसविले.

प्रा. विनायक माथणे यांनी श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे मिळतात, ते त्यांनी आयुष्यभर जपले पाहिजेत असे सांगितले.

विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रा. डॉ. सौ. एम. आर. सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांचे रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्यावतीने पथनाट्य सादर केले. प्रा. बळीराम लोहार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एल. जी. गणगे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. सौ. एस. एस. डिगे, प्रा. कु. मोळावडे, प्रा. आर. के. शिर्के, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. बी. जे. रासकर, प्रा. व्ही. एस. कांबळे, बिबी, मौजे सलतेवाडी गावचे ग्रामस्थ व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

ऐक्य

# बाळासाहेब देसाई कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी श्रमदानातून साकारले वनराई बंधारे

▲ पाटण, दि. १८ : पाणी आडवा, पाणी जिरवा या जीवसृष्टीच्या रक्षणासाठी सुपिक कल्पनेतून पिंपळोशी, कोयना भागातील गोकुळ येथे असलेल्या डोंगर उतारावर एनएसएसचे स्वयंसेवक, प्राध्यापक, एन. जी. ओ. व ग्रामस्थांच्या मदतीने श्रमदानातून ५ वनराई बंधारे बांधण्यात येत आहेत. या वनराई बंधाऱ्यांमुळे पाटण तालुक्याच्या डोंगराळ भागात अनेक ठिकाणी भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार असून या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.



वनराई बंधाऱ्यासोबत प्राध्यापक व एन.एस.एस.चे विद्यार्थी. (श्रीगणेश गायकवाड)

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, एनएसएस विभाग व पिंपळोशी ग्रामपंचायत तसेच कोयना भागातील एन. जी. ओ. यांच्या माध्यमातून गोकुळ येथे एनएसएसचे स्वयंसेवक, प्राध्यापक व ग्रामस्थांनी एकत्रितपणे पिंपळोशी येथील नदीवर दोन बंधारे बांधण्यात आले तसेच गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गोकुळ जवळच असलेल्या डोंगर उतारावर पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेचा पुरेपूर प्रत्यक्षात उपयोग करण्यासाठी छोटे-छोटे मातीचे जवळपास तीस फूट लांब व चार फूट रुंद बंधारे बांधून पूर्ण केले. पावसाळ्यातील परतीच्या पावसाचे पाणी वनराई बंधाऱ्यामुळे अडवले गेल्याने या पाणीसाठ्याचा भविष्यात उपयोग डोंगर परिसरातील पशु-पक्षी, जनावरे निसर्गातील प्रत्येक घटकाला याचा फायदा होईल अशा कल्पनेतून हे वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत.

श्रमदान राबविण्यासाठी पिंपळोशी ग्रामपंचायतीचे सरपंच विशाल निकम, सर्व पदाधिकारी, एनजीओचे सुनील काळे, बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव, ज्युनिअर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. शेखर फुटाणे, पिंपळोशी ग्रामपंचायत पदाधिकारी, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांच्या श्रमदानाच्या माध्यमातून निसर्ग रक्षणासाठी पाच ठिकाणी वनराई बंधारे बांधण्यात आले.

यावेळी बाळासाहेब देसाई कॉलेजचे डॉ. संदीप तडाखे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. एल. जी. गणगे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के. शिर्के, प्रा. सौ. डॉ. एस. एस. कुंभार, प्रा. सौ. शिर्के, प्रा. सौ. टी. आय. पाटणकर तसेच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी श्रमदानात सहभाग नोंदविला.

DainikAikya Edition
Feb 19, 2024 Page No. 8
Powered by : eReleGo.com

